ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME - 7 | ISSUE - 3 | APRIL - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# शहीद भगतसिंग – आजच्या काळाची गरज

डॉ. संग्राम चव्हाण
वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

**प्रस्तावना :-**




२८ सप्टेंबर १९०७ साली लाहोर जवळील बांगा नावाच्या खेड्यात भगतसिंगाचा जन्म झाला. भारताला स्वातंत्र मिळावे म्हणून अनेकांनी हौतात्म्य पत्करले. त्या सर्वांनाच इतिहासात मानाचे स्थान आहे. पण त्या सर्वामध्ये भगतसिंग यांचे स्थान अद्वितीय आहे. म्हणूनच त्यांना 'शहीदे आलम' असा किताब दिला जातो. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग लाहोरच्या तुरुंगात हसत हसत फासावर गेले. ' इन्किलाब झिंदाबाद ' हि घोषणा देऊन त्यांनी साम्राज्यवादा विरुद्धच्या लढ्यात हौतात्म्य पत्करले. २८ सप्टेंबर २००६-०७ शहीद भगतसिंग यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून देशभर साजरे करण्यात आले. शहीद भगतसिंग यांच्या व्यक्तीमत्वाची खरी ओळख व आजच्या काळातील त्यांचे स्थान, त्यांच्या विचारांचे महत्व या विषयीचे विवेचन करण्याचा प्रयत्न प्रस्तुतलेखा मध्ये करण्यात आला आहे.

शहीद भगतसिंग यांना एक सशस्त्र क्रांतिकारी, ज्याने ब्रिटीशांच्या अन्यायी राजवटी विरुद्ध सशस्त्र लढा दिला, इंग्रज अधिकाऱ्याचा वध करण्याकरीता पिस्तुलाचा, बॉम्बचा वापर केला व हे कार्य करीत शेवटी शहीद झाला असा एक तरुण युवक म्हणून चित्रित केले जाते. परंतु शहीद भगतसिंगांची हि खरी ओळख नव्हे. अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या काहींनी तर भगतसिंग माथेफिरू होता, अतिरेकी होता असे म्हणण्यापर्यंत मजल मारली आहे. शहीद भगतसिंगाने फासावर जाताना गीतेचे पठाण केले असे वर्णन करून त्याला धार्मिक वृतीचा दाखवण्याचा प्रयत्न हि केला जातो. परंतु शहीद भगतसिंगाचे हे खरे व्यक्तीमत्व नव्हे. शहीद भगतसिंग हे एकूणच मानव जातीतील अन्याय, शोषण व पिळवणूकी विरुद्ध उभारलेले बंड होय. शहीद भगतसिंग यांनी शस्त्रांचा वापर नाईलाजाने केला होता. शस्त्रांचा वापर करण्यामागे कोणा एका व्यक्तीचा वध करणे हि भावना नव्हती तर अन्याय व शोषण करणाऱ्या साम्राज्यवादी प्रवृतीचा नायनाट करणे हि भूमिका होती. क्रांती साठी त्यांनी नाईलाजाने शस्त्रांचा वापर केला.

महात्मा गांधी आणि शहीद भगतसिंग या दोन व्यक्तिरेखा दोन विरुद्ध मतप्रवाह म्हणून एकमेकाविरुद्ध उभ्या केल्या जातात, याचे कारण क्रांती आणि हिंसा, तसेच शस्त्रांचा वापर न करणे आणि अहिंसा यांच्यात जोडलेला चुकीचा संबंध होय. भगतसिंगाच्या सशस्त्र क्रांतीचा अर्थ लोकांनी हिंसा, विद्रोह, दहशतवाद असा

घेतला.तर गांधीजींच्या अहिंसेचा अर्थ शस्त्र न उचलणे, निमुटपणे अन्याय सहन करणे असा घेतला. या गैरसमजुती मुळेच या दोन महान व्यक्तीरेखा एकमेकांच्या विरुद्ध वाटतात. वास्तविक पाहता या दोन्ही व्यक्तीरेखा एकाच गोष्टी साठी लढल्या व ती म्हणजे साम्राज्यवादाचे उच्चाटन होय. जीव घेणे हि नेहमीच हिंसा असते असे नांही त्यामुळे न मारणे एवढाच अहिंसेचा अर्थ नाही असे महात्मा गांधीजी म्हणतात. पिसाट कुत्र्याला मारणे किंवा खुनी व्यक्तीला मारणे हिंसा नाही म्हणजे क्रोधाला किंवा स्वार्थाला वश होऊन अथवा दुसऱ्या व्यक्तीचे अनिष्ठ करण्याच्या इराद्याने तिला दुख देणे किंवा तिच्या देहाचा नाश करणे म्हणजे हिंसा व तसे न करणे म्हणजे अहिंसा असा अहिंसेचा अर्थ गांधीजीना अपेक्षित होता. तर क्रांती म्हणजे पिस्तुल किंवा बॉम्बचा वापर किंवा हिंसा नव्हे असे भगतसिंग म्हणतात. क्रांती म्हणजे केवळ विद्रोह नव्हे. क्रांती म्हणजे परिस्थिती अमुलाग्र सुधारण्याची आकांक्षा. क्रांती हे जनतेने राजकीय , आर्थिक, सामाजिक स्थिती मध्ये परिवर्तन करण्याच्या इछेचे द्योतक होय असा क्रांतीचा अर्थ भगतसिंगा यांना अपेक्षित होता. भारता मध्ये सशस्त्र क्रांती यशस्वी न होण्याचे एकमेव कारण म्हणजे लोकांचे क्रांती व अहिंसा प्रती असलेले अज्ञान होय.

साम्राज्यवादा विरुद्ध लढा द्यावयाचा असेल तर महात्मा गांधी व शहीद भगतसिंग या दोन व्यक्तीरेखा निट समजून घेतल्या पाहिजेत. साम्राज्यवादाविरूद्ध लढा देण्याकरीता गांधीजीनी जन आंदोलने उभारली परंतु या संघटीत शक्तीचा क्रांती करिता त्यांनी प्रयत्न केला नाही. याउलट शहीद भगतसिंगांनी क्रांतीसाठी बलिदान दिले परंतु जन आंदोलन उभे करण्याकरिता त्यांनी फारसे प्रयत्न केले नाहीत किंवा त्याना त्यामध्ये यश प्राप्त होऊ शकले नाही. त्यामुळे भगतसिंग म्हणजे एक सशस्त्र क्रांतीकारक एवढीच त्यांची प्रतिमा उभी राहते. परंतु भगतसिंग यांनी वाचन केलेली ग्रंथ संपदा, त्यांनी मांडलेले विविध विचार, समाजवादाचा आग्रह, स्वातंत्र्याच्या प्रती असलेली त्यांची व्यापक दृष्टी हे सर्व पहिले असता भगतसिंग हे केवळ एक सशस्त्र क्रांतिकारक होते असे म्हणणे चुकीचे ठरते. शहीद भगतसिंगांनी कृती जरी हिंसक केली असली तरी त्यांचे अंतिम लक्ष अहिंसा व विश्व कल्याण हेच होते.

साम्राज्यवादा विरुद्ध लढा देण्याकरिता त्या काळा मध्ये भगतसिंगांची जितकी गरज होती तितकीच आजच्या काळात देखील आहे. भारतातून ब्रिटीशांची राजवट गेली असली तरी साम्राज्यवाद नष्ठ झालेला नाही. पूर्वी अन्याय व शोषण करणारे परकीय होते आता स्वकीय आहेत. म्हणजे एकूण शोषण व्यवस्था आजही टिकून आहे. भांडवलशाहीच्या रूपाने साम्राज्यवाद पुन्हा फोफावत आहे. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणांमुळे कामगार व शेत मजुरांचे शोषण होत आहे. त्या मुळेच शेतकरी व कामगारांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. आर्थिक विषमता वाढत आहे. शेतकर्यांच्या जमिनी मातीमोल किमतीने हडप केल्या जात आहेत. या मुळेच शहीद भगतसिंग हि आज काळाची गरज आहे.

शहीद भगतसिंगांना अपेक्षित असलेली क्रांती जर घडवून आणावयाची असेल तर सर्वहारा वर्गाची शक्ती वाढवली पाहिजे. त्याना संघटीत करून निर्भय केले पाहिजे. सशस्त्र हिंसा हा आजचा लढा देण्याचा योग्य मार्ग होऊ शकत नसला तरी अहिंसेचा चुकीचा अर्थ घेऊन अन्याय व अत्याचार निमूटपणे सहन करणे हा देखील योग्य मार्ग नव्हे. आज गावागावा मध्ये दलितांवर, महिलांवर अत्याचार होत आहेत. गावा मध्ये महिलांची विवस्त्र धिंड काढली जाते, दलितांच्या झोपड्या जाळल्या जातात, भ्रष्टाचारी प्रवृत्ती मुळे सामान्य माणसाचे जगणे मुश्कील झाले आहे. हे सर्व निमूटपणे पाहणे नामर्दपणाचे लक्षण होय. ज्या देशामध्ये शहीद भगतसिंग सारखे क्रांतिकारक जन्मले त्या देशातील तरुण पिढी अशी नामर्द का? असा प्रश्न उभा राहतो. शहीद भगतसिंगांना अपेक्षित असलेला स्वातंत्र्याचा अर्थ केवळ ब्रिटीशांची भारतावरील सत्ता उखडून टाकणे

एवढ्यापुरता मर्यादित नव्हता तर एकूण मानवजात शोषण मुक्त करणे हा स्वातंत्र्याचा अर्थ त्याना अपेक्षित होता. आजच्या काळात गुन्हेगार हे निर्भयपणे जगत आहेत तर प्रामाणिक माणूस जीव मुठीत घेऊन जगत आहे याचे कारण गुन्हेगार संघटीत आहेत त्यांचे सुरक्षा यंत्रणेवर वर्चस्व आहे. गुन्हेगारी व साम्राज्यवादी शक्तीला जरब बसावी याकरीता तरुण वर्गाची शक्ती संघटीत केली पाहिजे. या युवाशक्तीला सकारात्मक व विधायक मार्गाने सक्रीय केले पाहिजे. युवकांचा एक 'सकारात्मक दबाव गट' (Positive Pressure Group) तयार झाला पाहिजे. अन्याय व शोषणा विरुद्ध सर्वांनी संघटीत होऊन कायदेशीर मार्गाने लढा दिला पाहिजे. तसे झाले तरच ती शहीद भगतसिंग व तमाम क्रांतिकारक व शहिदांच्या प्रती आदरांजली ठरेल.

संदर्भ:


- शहीद भगतसिंग - मी नास्तिक का आहे?, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर. मार्च २००६.
- शहीद भगतसिंग – निद्राग्रस्त सिंहानो उठा ! उठा व विद्रोह करा !, आव्हान नाट्यमंच, मुंबई. मार्च २००६.
- शहीद भगतसिंग संकेतस्थळ